# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १३९-२३** **दिनांक :- ०५/०५/२०२३**

## अवैध अग्निशस्त्र व जिवंत काडतुस अवैधरित्या कब्जात बाळगल्याप्रकरणी ०२ आरोपीतांना अटक पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, दिनांक ०४/०५/२०२३ रोजी १९.५० वा.चे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०४/०५/२०२३ रोजी १९:५० वा.चे सुमारास आर्म स्टॉंग इंडीया कन्ट्रक्शन आरएमसी प्लँन्ट कंपणीचे समोर, रिचर्ड कंपाऊन्ड, मनिचापाडा, पोस्ट पेल्हार, नालासोपारा पुर्व या ठिकाणी दोन इसम त्यांचे कब्जात विना परवाना व बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र घेवुन येणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वर नमुद ठिकाणी सापळा कारवाई करुन अरोपीत नामे १) मोईन अन्वर शेख, रा. वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर, २) शकील अहमद इसरार खान, रा. वाकनपाडा,नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि. पालघर मुळ रा. जि. आझमगढ, राज्य उत्तरप्रदेश यांस शिताफिने ताब्यात घेवुन नमुद आरोपीतांची पंचासमक्ष अंगझडती घेतील असता त्यांचे कब्जात ०१ स्वयंचलित अग्निशस्त्र (ॲटोमॉटिक पिस्टल), व ०१ जिवंत काडतुस असा एकुण २५,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदरचे अग्निशस्त्र व ०१ जिवंत काडतुस पंचासमक्ष जप्त करण्यात आले. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा. रजि.नं. I ४३२/२०२३ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ अन्वये दिनांक ०५/०५/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनिरी/किरण वळवी नेम. पेल्हार पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. वसंत लब्दे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, गोरखनाथ खोत, प्रताप पाचुंदे, पो.अंम संदिप शेळके, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, निखिल मंडलिक यांनी पार पाडली असुन हे करत आहे.

----000----